ePaper
वर्ष - 7 । अंक - 7 UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

# "...तर लोक उद्धव ठाकरेंच्या तोंडावर थुंकतील", रामदास कदम



## आतील पानांत


- पुण्यात धक्कादायक प्रकार
- घातक कचरा प्रश्नावर तोडगा!
- शरद पवारांचा राजीनामा


www.mahaenews.com । बुधवार, दि.3 मे 2023 । पिंपरी-चिंचवड आवृत्ती । mahaenews.com । maha_enews । Mahaenews

# शिवसृष्टीला महाविकास आघाडीचाच 'खोडा'!

## » राष्ट्रवादीचा बेगडीपणा उघड : रेखांकन प्रक्रिया झाली, समजलीच नाही

। पिंपरी ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निगडी येथील प्राधिकरणाच्या जागेतील शिवतीर्थ मैदानावर शिवसृष्टी उभारण्याकरिता देण्याबाबत गेल्या अनेक दिवसांपासून शहरातील सर्व पक्षीय नेते आणि पदाधिकारी आंदोलन, निवेदन आणि स्वाक्षरी मोहीम राबवत आहेत. विशेष म्हणजे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आंदोलनात सहभागी होत 'राजकीय फार्स' करण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रकरणातील 'फॅक्ट चेक' केली असता राज्यातील महाविकास आघाडीच्या सत्ताकाळातच सदर भूखंडाचे रेखांकन करुन पुढील कार्यवाहीचे पत्र पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने दिल्याचे स्पष्ट झाले आहे.**

निगडी- प्राधिकरण येथील पेठ क्रमांक २४ सर्व्हे नंबर १२, १३ व १४ मधील मोकळ्या जागेत भक्ती-शक्ती शिव जयंती उत्सव समिती आणि महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून विविध समाज प्रबोधन कार्यक्रम अगदी भक्ती-शक्ती शिल्पाची उभारणी केल्यापासून होत आहेत.

ही जागा पिंपरी-चिंचवड नगरनगर विकास प्राधिकरणासाठी संपादन केली असून, त्याचा ताबा प्राधिकरणास मिळालेला आहे. प्राधिकरणाच्या मंजूर विकास आराखड्यानुसार, ही जागा व्यापारी कारणासाठी आरक्षित करण्यात आली होती. पण, जागेमधून हायटेन्शन लाईन जात असल्यामुळे सदर जागेतील व्यापारी भूखंड विक्री करता येत नव्हते. त्यामुळे हायटेन्शन लाईन स्थलांतरित करण्यात आली.






त्यानंतर महापालिका प्रशासनाने संबंधित भूखंडाचे रेखांकन मंजूर केले आणि तसे पत्र दि. १४ जून २०२२ रोजी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला पाठवले आहे. महापालिका प्रशासनाने रेखांकन मंजूर केले. त्यावेळी राज्यात महाविकास आघाडीची सत्ता तत्कालीन आयुक्त राजेश पाटील होते आणि 'पीएमआरडीए'चे पदसिद्ध अध्यक्ष तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे होते.

शहरातील राष्ट्रवादीसह महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी महापालिका प्रशासनावर दबाव निर्माण केला असता, तर रेखांकन मंजुर झाले नसते आणि पुढे जावून ई-लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली नसती. कारण, रेखांकन मंजुरीच्या पत्रानंतरच 'पीएमआरडीए'ने ई-लिलावासाठी दि. २२ ऑगस्ट २०२२ रोजी वृत्तपत्रात जाहिरात दिली. त्यानंतर दि. १० ऑक्टोबर २०२२ रोजी लिलाव प्रक्रिया पूर्ण झाली. पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने प्रशासक काळात आणि महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात रेखांकन प्रक्रिया राबवली. त्यासाठी आवश्यक कार्यवाही पूर्ण केली. त्यानंतर राज्यातील सरकार बदलले. दरम्यान, दोन महिन्यातच पीएमआरडीए प्रशासनाने ई-लिलाव प्रक्रिया राबवली, असे स्पष्ट होते. शिंदे-फडणवीस सरकारचे पहिले अधिवेशन नागपूरमध्ये झाले. चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी तारांकीत प्रश्न ५०१९३ अनुसार लिलाव प्रक्रियेस स्थगिती मिळण्याबाबत विनंती केली.

### मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली स्थगिती...

» शिवप्रेमी आणि भक्ती-शक्ती शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने दिपक बाजीराव काळभोर यांनी दि. १५ मार्च २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे अर्ज केला. यासह आमदार महेश लांडगे यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले. त्यामुळे नागपूर अधिवेशनात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेला निर्णय बदलला. शिवप्रेमींच्या भावनांचा आदर करीत "MC, PMRDA 'अ' स्थगिती देऊन तात्काळ तपासून सादर करावे" असा शेरा दिला आहे.

### 'पीएमआरडीए'ची भूमिका काय?

» 'पीएमआरडीए'चे महानगर आयुक्त राहुल महिवाल यांनी याबाबत राज्याच्या नगर विकास विभागाचे अप्पर सचिव यांना पत्र पाठवले आहे. त्यानुसार, मौजे निगडी येलि सर्व्हे नंबर १०/१ क्षेत्र १ हे. ३७ आर, सर्व्हे नंबर १४/३ क्षेत्र २ हे. ९७.२ आर, सव्हे नंबर १४/६ बी क्षेत्र ० हे. ४१ आर एकूण क्षेत्र ४ हे. ७५.२ आर या जमिनीचा ताबा हा दि. १८ ऑगस्ट १९७७ च्या ताबेपावतीनुसार पुणे प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडे आहे.

# मालमत्तांच्या सर्व्हेक्षणसाठी 'ड्रोन' ची सुविधा!

## » महापालिका प्रशासनाची तयारी : अनधिकृत बांधकांना बसणार आळा

। पिंपरी। महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड शहरातील वाढीव मालमत्ता, वापरात बदल, नवीन मालमत्तांचे ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे. यासाठी स्थापत्य कंन्सलटट इंडिया या संस्थेची नेमणूक केली असून या संस्थेला 48 कोटी रूपये दिले जाणार आहेत. या खर्चाला आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समितीच्या बैठकीत मान्यता दिली आहे.**

शहरात 5 लाख 97 हजार 785 मालमत्ता आहेत. अनेक जण मालमत्तांची महापालिकेच्या दप्तरी नोंद करत नसल्याचे वेळोवेळी झालेल्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. महापालिकेने 2013 मध्ये सर्वेक्षण केले असता यामध्ये सुमारे 35 हजार तर 2021 मध्ये झालेल्या सर्वेक्षणात 21 हजार नवीन मालमत्ता आढळून आल्या होत्या.

मात्र, यानंतरही शहरात नोंद नसलेल्या सुमारे 1 लाखांपेक्षा जास्त



मालमत्ता असण्याची शक्यता महापालिकेला वाटत आहे. त्यामुळे महापालिकेने ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी मे स्थापत्य कंन्सलटट इंडिया प्रा. लि. या ठेकेदाराची निवड केली. या कामाची तीन वर्षांची मुदत असणार आहे. सादर केलेले दर हे तुलनात्मकदृष्ट्या वाजवी असल्याने तसेच ठेकेदार मुदतीमध्ये काम करण्यास सक्षम असल्याने ही निविदा मान्य करण्यात आली. या सर्वेक्षणात एक लाख मालमत्ता सापडतील असा विश्वास कर आकारणी व कर संकलन विभागाने केला आहे.

### 'त्या' बांधकांची होणार नोंदणी...

» वाल्हेकरवाडी, चिखली, तळवडे यासह विविध भागात मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे आहेत. या बांधकामाच्या पालिकेकडे नोंदी नसल्याने त्यांना कर आकारणी होत नाही. त्यामुळे महापालिकेचे कोट्यावधी रूपयांचे नुकसान होत आहे. ड्रोनद्वारे सर्वेक्षण होणार असल्यामुळे प्रत्येक बांधकाम सर्वेक्षणात सापडणार आहे. सर्वेक्षणात सापडलेल्या बांधकामाची नोंद करून कर आकारणी केली जाणार आहे.

# टोईंग कर्मचाऱ्यांकडून मारहाण!

## बाईक नो पार्किंगमध्येः पुण्यात धक्कादायक प्रकार! कपडे फाटेपर्यंत मारले!

।पुणे।
।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**रस्ते अपघातात मुपुण्यात नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावे लागणे हे नित्याचेच झाले आहे. त्यात पुण्यातील कोणत्याही रस्त्यावर गेले तरी पार्किंगची समस्याही दिवसेंदिवस भीषण होत आहे. त्यामुळे नो पार्किंगमध्ये वाहने उभे करण्याचे प्रमाण वाढले आहे. परिणामी नो पार्किंगमधील उभी असलेली वाहने टोईंग करताना कर्मचारी आणि वाहनचालक यांच्यात वाद होत असतात. यात प्रामुख्याने टोईंग कर्मचाऱ्यांची दादागिरी ही नेहमीच पाहायला मिळते. अशाच एका धक्कादायक प्रकाराचा व्हिडिओ पुण्यातील हडपसर भागातून समोर आला आहे.**



पुणे : हडपसर परिसरातील महादेवनगर येथील दुकानदार रमेश बराई यांना रस्त्यावरील वाहने उचलण्यासाठी वाहतूक शाखेने नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी तुफान मारहाण केल्याचं व्हिडिओतून स्पष्ट झालं आहे. विशेष म्हणजे वाहतूक पोलीस कर्मचाऱ्यासमोरच ही फ्री स्टाईल हाणामारी झाली आहे.

### धक्कादायक प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद

**दरम्यान, सदर घटना घडत असताना तेव्हा एक महिला पोलीस कर्मचारी देखील तेथे उपस्थित होत्या. त्यांच्यासमोर बराई वीट घेऊन धावून आले. त्यामुळे तरुण कर्मचाऱ्यांनी बराई यांना कपडे फाटेपर्यंत तुफान मारहाण केली. हा धक्कादायक प्रकार तिथे असलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.**

यामध्ये रमेश बराई यांना टोईंग कर्मचाऱ्यांनी कपडे फाटेपर्यंत मारहाण केली. यासंदर्भात बराई यांनी तक्रार दिली असून या कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

रमेश बराई यांचे महादेवनगर परिसरात फुटवेअरचे दुकान आहे. त्यांच्या दुकानासमोर दुचाकी खाली पडून पेट्रोल गळत होते. ती उभी करत असताना टोईंग व्हॅन अन् पोलीस कर्मचारी महिलेसह गाडी उचलणारे तरुण खाली उतरले. त्यावेळी एकाने दुकानदार रमेश बराई यांच्याशी वाद घालण्यास सुरूवात केली. त्यांना शिवीगाळ केली. कर्मचाऱ्याने शिवीगाळ केल्याने बराई यांना देखील राग अनावर झाला आणि त्यांनी थेट हातात एक वीट घेऊन कर्मचाऱ्यांच्या दिशेने धाव घेतली.

# शरद पवारांचा राजीनामा, पुण्यातील कार्यकर्त्याला धक्का

## स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून आपला निर्णय बदलण्याची विनंती

।पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांनी अध्यक्ष पदावरून निवृत्त होण्याची घोषणा केली. या घोषणेनंतर राज्यभर पडसाद उमटले. कोणी आपल्या पदाचा राजीनामा दिला तर कोणी शरद पवारांना आपल्या स्वतःच्या रक्ताने पत्र लिहून आपला निर्णय बदलावा असं म्हटलं आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी पक्षाच्या अध्यक्ष पदावरून निवृत्त होण्याची घोषणा केली. या घोषणेनंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी तसेच नेते मंडळी आणि राज्यभरातील कार्यकर्ते हे भावूक झाले असून शरद पवार यांनी निर्णय मागे घ्यावा, अशी विनंती सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात येत आहे.

पक्षाचे पदाधिकारी आणि नेतेमंडळी यांच्याकडून पवार यांची मनधरणी सुरू असून आता पवार यावर काय निर्णय घेतात याकडे सर्वांचं लक्ष लागून आहे. पुण्यातील एका कार्यकर्त्याने तर चक्क स्वतःच्या रक्ताने शरद पवार यांना पत्र लिहून साहेब आपण निर्णय बदलावा असं म्हटलंआहे.

साहेब प्रतिष्ठान तसेच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे कार्यकर्ते संदीप काळे याने आपल्या स्वतःच्या रक्ताने पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांना पत्र लिहिलं आहे. "साहेब आपण घेतलेला हा निर्णय कोणालाच मान्य नसून आपल्या या निर्णयाने आम्ही पोरके झाले आहोत. आमचे दैवत असून आपण हा निर्णय बदलावा", अशी मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे.





### नव्या अध्यक्षाच्या पाठीशी उभे राहू

**अजित पवार यांनी शरद पवार यांच्या निर्णयाला विरोध करणाऱ्या कार्यकर्ते आणि नेत्यांना सुनावताना म्हटलं की,"साहेबांच्या डोळ्यादेखत अध्यक्ष तयार झाला तर तुम्हाला का नको? साहेब देशात, महाराष्ट्रात फिरणारच आहेत. त्यांचे मार्गदर्शन आपल्याला असणारच आहे. पवार साहेब अध्यक्ष नाहीत म्हणजे पक्षात नाहीत असं नव्हे. शरद पवार यांनी निर्णय घेतला आहे. भावनिक होऊ नका. आपण नव्या अध्यक्षाच्या पाठीशी उभे राहू", असं आवाहन अजित पवार यांनी केलं.**

# जुन्नरला ११ ग्रामपंचायतींच्या जागा पुन्हा राहणार रिक्त

।जुन्नर,। महाईन्यूज ।
प्रतिनिधी।



जुन्नर तालुक्यातील पोटनिवडणुका होत असलेल्या ४४ ग्रामपंचायतींपैकी उमेदवारी अर्ज न आल्याने ११ ग्रामपंचायतींच्या जागा पुन्हा रिक्त राहिल्या आहेत. त्यामुळे येथे पुन्हा पोटनिवडणूक घ्यावी लागणार आहे.

काले, भिवाडे बुद्रुक, खिलारवाडी, उंडेखडक, मढ, माणिकडोह, अंजनावळे, सुलतानपूर, सोमतवाडी, खानापूर, वानेवाडी या ग्रामपंचायतीच्या सदस्यांच्या रिक्त जगसंसाठी एकही अर्ज आला नाही. वानेवाडीच्या थेट सरपंच व सदस्य पोटनिवडणुकीसाठी एकही अर्ज आला नाही. उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा मंगळवारचा (ता. २) शेवटचा दिवस होता.

हातवीज- तीन, इंगळूण- दोन ,अलदरे- एक, उच्छिल- एक, दातखळवाडी- दोन, गोद्रे- दोन, राजूर- दोन, आपटाळे- एक, येणेरे- दोन, चावंड- एक, पूर- एक, नळवणे- एक, पारगावतर्फे मढ- चार, अहिनवेवाडी- एक, वारूळवाडी- चार, मंगरूळ- पाच, अशा एकूण ३३ जागांसाठी ३५ जणांनी अर्ज दाखल केले आहेत. चावंड व नळावणे येथील प्रत्येकी एक जागेसाठी दोन उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

उमेदवारी अर्जाची छाननी बुधवारी (ता. ३) होणार असून, उमेदवारी अर्ज ८ मे रोजी दुपारी ३ पर्यंत माघारी घेता येणार आहे. त्यानंतर निवडणूक चिन्हांचे वाटप करण्यात येणार आहे. १८ मे रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान व मतमोजणी १९ मे रोजी होणार आहे.

## आत्मकेंद्री राजकारणामुळेच पिंपरी-चिंचवड

# घातक कचरा प्रश्नावर तोडगा!

### प्रक्रिया केंद्र उभारणीला मान्यता : दोनही ठिकाणी केंद्राचे नियोजन

। पिंपरी ।

।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या पर्यावरण विभागामार्फत दोन ठिकाणी घरगुती घातक कचरा प्रक्रिया केंद्र उभारण्यात येणार आहेत. त्याबाबतच्या प्रस्तावाला आयुक्त शेखर सिंह यांनी मान्यता दिली. महापालिका सभा आणि स्थायी समिती सभेची मान्यता आवश्यक असलेल्या विविध विषयांना आयुक्त सिंह यांनी मंजुरी दिली. या बैठकीस अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, जितेंद्र वाघ, उल्हास जगताप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.**



महापालिका क्रीडा विभागास आवश्यक विविध इंनडोअर जिम साहित्य नमुन्याचे स्पेशिफिकेशनप्रमाणे तांत्रिक तपासणी अहवालाकरीता सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ,पुणे यांना अदा करण्याचे मानधन, एम.डी.आर 31 रस्त्यावरील खोदलेल्या चरांची व फुटपाथची दुरुस्ती करणे. आवश्यकतेनुसार रस्ता रुंदीकरण करणे तसेच रस्त्यावरील स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली.

बोपखेल फाटा ते आळंदी रस्त्याचे तसेच देहु ते आळंदी रस्त्यावरील खोदलेल्या चरांची व फुटपाथची दुरुस्ती करणे, रस्त्यावरील स्थापत्य विषयक कामे करण्यास मान्यता देण्यात आली.

त्याचप्रमाणे एम्पायर ईस्टेट येथील सेवा रस्त्यांचे डांबरीकरण करण्याबाबत येणाऱ्या खर्चास, महापालिका मुख्य कार्यालय व इतर विविध कार्यालयातील संगणकीय केबल नेटवर्क करणेबाबत, महापालिकेच्या नविन कार्यालयांना इंटरनेट सेवा उपलब्ध करून देणे, क क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र.8 मधील विविध उद्याने देखभाल, विविध सामुदायिक व सार्वजनिक शौचालयाचे स्वच्छता व देखभाल दुरुस्तीचे कामकाज करण्याबाबत येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.

#### विविध कामांना प्रशासनाची मान्यता...

**टेल्को रस्त्यावरील चरांची व फुटपाथची दुरुस्ती करणे. आवश्यकतेनुसार रस्ता रुंदीकरण करणे. रस्त्यावरील स्थापत्य विषयक करणे, कोविड-19 जैव वैद्यकीय कचरा गोळा करणे आणि त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट करण्यासाठी येणाऱ्या खर्चास, वैद्यकीय विभागामार्फत तज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची कंत्राटी वेतनावर करारनामा करून 11 महिन्याकरिता नेमणूक करणे, आरोग्य विभागासाठी क्लॉथ बॅग व्हेंडिंग मशीन खरेदी करणे, महापालिकेच्या विविध विभागास अभिलेख रुमाल खरेदी करणे तसेच मनपा रुग्णालयांतील ओटी/विभागास रुग्ण व डॉक्टर यांचे करीता गणवेश खरेदीसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.**

---

## बोऱ्हाडेवाडी- येथील 'डीपी' रस्ता विकासित करावा : निखिल बोऱ्हाडे

### महापालिका आयुक्तांना निवेदन



।पिंपरी ।

।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**वाढते शहरीकरण, वाहतूकीकरण आणि नागरिकांच्या समस्या लक्षात घेता, मोशी-बोऱ्हाडेवाडी-जाधववाडी येथील 30 मीटर डीपी रस्ता विकसित करण्यात यावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते निखिल बोऱ्हाडे यांनी केली आहे.**

याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, देहू-आळंदी या मार्गावरील वाहतूक अतिशय मोठ्या प्रमाणात वाढत आहे. या बाबीचा प्रकर्षाने विचार करता, मोशी, बोऱ्हाडेवाडी, चिखली, जाधववाडी, तळवडे या भागांमध्ये मोठ्या प्रमाणात रहिवाशी वाढल्यामुळे ये-जा करण्यास नागरिकांना त्रास होत आहे. हा रस्ता 30 मीटर असून, याचा मार्ग निघण्याचे ठिकाण हवलदार वस्तीपासून बोऱ्हाडेवाडी, जाधववाडी, चिखली, कुदळवाडी, सोनावणे वस्तीपासून तळवडे रस्त्याला जोडला जोतो. त्यामुळे हा रस्ता विकसित झाला तर या भागांमधील वाहतूक कोंडी होणार नाही.

> **मोशी-बोऱ्हाडेवाडी-जाधववाडी येथील रस्ता हा 80 टक्के मनपाच्या ताब्यात आहे व हा रस्ता विकसित करण्यासाठी कुठल्याही प्रकारे अडचण येणार नाही. यासाठी या रस्त्याचे काम पूर्ण करून द्यावे. अशी आमची ग्रामस्थांची आग्रही मागणी आहे.**
>
> **- निखिल बोऱ्हाडे, सामाजिक कार्यकर्ते.**

## ... अन्यथा आमचा सामूदायिक राजीनामा!

### शहर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची तयारी : शरद पवार यांचा राजीनामा मागे घेण्याची मागणी

।पिंपरी ।

।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

शरद पवार यांच्या मार्गदर्शनाखालीच आम्ही आमची आजपर्यंतची राजकीय वाटचाल केली आहे. शरद पवार हे आमचे दैवत आहेत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली आम्ही यापुढेही कार्यरत राहणार आहोत. त्यांनी राजीनामा मागे घ्यावी अशी आमची सर्वांची इच्छा असून त्यांनी राजीनामा मागे न घेतल्यास आम्हीही सामूहिक राजीनामा देऊ अशी जाहीर भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी जाहीर केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी आज (दि. २) निवृत्तीची घोषणा केल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते भावूक झाले. शरद पवार यांनी अचानक घेतलेला निर्णय हा कार्यकर्त्यांना मोठा धक्का देणारा ठरला आहे. त्याबाबत अजित गव्हाणे यांनी एक पत्रक प्रसिद्धीस दिले असून त्यात म्हटले आहे की, आमच्या राजकारणाची




सुरुवातच शरद पवार यांच्याकडे पाहून झाली आहे. ते आमचे दैवत आणि राजकीय आदर्श आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाशिवाय राजकीय क्षेत्रात काम करणे हे अशक्य आहे.

शहरातील सर्व कार्यकर्त्यांमध्ये या निर्णयामुळे भावनिक वातावरण निर्माण झाले आहे. शरद पवार हेच पक्षाचे अध्यक्ष असायला हवेत, अशी आमची सर्वांची इच्छा आहे. त्यामुळे त्यांनी राजीनामा मागे घ्यावा, अशी आम्ही मागणी करत असल्याचेही गव्हाणे यांनी या पत्रात म्हटले आहे.



> **आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्याशिवाय राजकारण आणि राजकारणाशिवाय पवार साहेब याची कल्पना होवू शकत नाही. पवार साहेबांच्या शिव फुले शाहू आंबेडकर या विचारधारेमुळे आम्ही राजकारणात आलो. आता देवच नसेल देव्हाऱ्यात नसेल तर त्याची पूजा करून काय फायदा तर त्याची पूजा करून काय फायदा ? सध्या देशातील एकूणच परिस्थिती पाहता महाराष्ट्रातील तसेच देशातील अल्पसंख्याक समाज आदरणीय शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या कडे मोठ्या आशेने पाहत आहे आदरणीय पवार साहेब ही अल्पसंख्याक समाजाची शेवटची आशा आहे. जर आदरणीय शरद पवार साहेबांनी राजीनामा परत घेतला नाही तर शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांच्या समवेत आम्ही पिंपरी चिंचवड शहरातील युवक पदाधिकारी सामूहिक राजीनामे देणार आहोत.**
>
> **– इम्रान शेख, शहराध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस पिंपरी-चिंचवड.**

## संपादकीय »

### कामगारांचा आवाज ऐकावा लागेल

***आपले जीवन सुखकर करण्यात ज्यांचा मोलाचा वाटा आहे, अशा कामगारांचे स्मरण करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी 'आंतरराष्ट्रीय कामगार दिन' साजरा केला जातो. हक्कांसाठी कामगारांनी दिलेल्या दीर्घ लढ्याचेही आजच्या दिवशी स्मरण केले जाते. यानिमित्ताने मोदी सरकारच्या सध्याच्या कामगार धोरणाची मीमांसा.***


स्वातंत्र्यानंतर प्रत्येक सरकारने कायमच कामगारांना संरक्षण देणारे आणि त्यांचे सक्षमीकरण करणारे धोरण राबविले. दुर्दैवाने, मोदी सरकारने कामगारांच्या हक्कांवर गदा आणली. सरकारी आस्थापनातील असोत किंवा खाजगी क्षेत्रातील असोत, कृषिक्षेत्रातील कामगार असोत की असंघटित कामगार, सर्वच स्तरातील कामगारांच्या हक्कांचे हनन होत आहे. त्यांचे म्हणणे ऐकून घेतले जात नाहीये. केंद्र सरकारने संसदेमध्ये घाईगडबडीत मंजूर करून घेतलेल्या चार कामगार संहिता या केंद्र सरकारच्या, कामगारांच्या हक्कांचे हनन करणाऱ्या धोरणाचेच उदाहरण आहे.

सुमारे चाळीसहून अधिक कायद्यामध्ये आता कालसुसंगत बदल करण्याची आवश्यक्ता आहे. परंतु कायद्यात कालसुसंगत बलदलाची आवश्यकता असल्याचे कारण पुढे करत मोदी सरकार, कायद्याने कामगारांना देण्यात आलेले संरक्षण कमकुवत करण्याचा आणि राज्य सरकारचा घटनात्मक अधिकार कमी करण्याचा प्रयत्न करत आहे.

या कामगार सहितांमध्ये चार घातक त्रुटी आहेत. ज्यामुळे या संहिता कामगारविरोधी असल्याचे सिद्ध होत आहे. यापैकी पहिली त्रुटी म्हणजे, बहुतांश आस्थापनांना आणि कामगारांना या संहिता लागू होत नाहीत. उदाहरणार्थ, कामगारांची संख्या ३००पेक्षा कमी असलेली आस्थापने तेथे काम करणाऱ्या कामगारांना सरकारच्या परवानगीशिवाय कामावरून काढून टाकू शकतात किंवा एखादा प्रकल्प बंद करू शकतात. त्याचप्रमाणे ५० कामगारांहून कमी कामगार असलेल्या कंत्राटदारांना कामाच्या ठिकाणी सुरक्षितता कायद्यांमधून सूट देण्यात आली आहे. लहान कंपन्यांमध्ये कामगारांना, भविष्य निर्वाह निधी, ग्रॅच्युईटी, विमा आणि गरोदरपणादरम्यान असलेल्या सुविधा उपलब्ध नाहीत.

# गौतमी पाटीलच नाही, समाजही नाचतोय... बैलासमोर!



गौतमी पाटील हे सध्या महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात चर्चेत असलेलं नाव आहे. तिचे नृत्याचे कार्यक्रम, त्याला मिळणारा प्रचंड प्रतिसाद, ग्रामीण भागात तिच्याविषयी असलेली 'क्रेझ', नृत्याच्या कार्यक्रमातील तिची 'अदाकारी', विशेषतः तिचे हावभाव- यांवरून होणारे तात्कालिक वाद, समाजमाध्यमांतून तिची मोठ्या प्रमाणात 'व्हायरल' होणारी ध्वनिचित्रमुद्रणं, तिच्या कार्यक्रमाच्या आयोजनाने निर्माण होणारा 'कायदा सुव्यवस्थे'चा प्रश्न, एका कार्यक्रमासाठी ती घेत असलेलं मानधन, हे सगळं पाहता... गौतमी पाटीलच्या तीन तासांच्या कार्यक्रमाने ग्रामीण भागांत पारंपरिक लोककला असलेल्या 'लोकनाट्य-तमाशा'ची चौकट केव्हाच मोडली आहे...!

अल्पावधीतच गौतमी पाटीलचा झालेला 'उत्कर्ष' हा या लेखाचा विषय नाही. चर्चेचा विषय वेगळा आहे...

पुणे जिल्ह्यातील मुळशी तालुक्यात एके ठिकाणी, बैलांच्या शर्यतीतील मानाच्या ठरलेल्या 'बावऱ्या' नावाच्या बैलासमोर गौतमी पाटील एकही प्रेक्षक नसताना तब्बल तास-दोन तास नाचली आणि पुन्हा एकदा गौतमी पाटील हे नाव चर्चेत आलं! आजपर्यंत तिच्या समाजमाध्यमांतून प्रसारित झालेल्या मुलाखती पाहिल्यानंतर एक गोष्ट लक्षात आली की, गौतमी पाटीलच्या बोलण्यातून तर ती एक साधी- सरळ मुलगी वाटते. कदाचित तिच्या भोवताली, तिच्या संदर्भात घडणाऱ्या गोष्टींचं तिला 'भान' असेलही! पण प्रत्येक गोष्टीवर 'व्यक्त' होणं तिला जमत नसावं.कुणी तरी 'मानधन' दिलं म्हणून, गौतमी पाटीलला बैलासमोर नाचायला भाग पाडणं किंवा गौतमी पाटीलने बैलासमोर नाचणं, हे कलेच्या क्षेत्रातलं शोषणच नाही का ठरत? कलाकार आणि रसिक यांचं नातं तोडून कला सादर करण्यासाठी भाग पाडणं, अशी सक्ती नाही का इथे?खरं तर, बैलाचाच काय पण कुठल्याही इतर जनावराचा मेंदू निसर्गाने मानवाइतपत विकसित केलेला नाही. रंजन-मनोरंजन हे मुक्या जनावरांना कसं कळणार? निसर्गतः मानवाने स्वरयंत्राचा कल्पकतेनं वापर करत भाषेचा शोध लावला आणि आपसूकच संदेशवहनाच्या सुलभतेने मानवाचा मेंदू विकसित होत गेला. त्यातून रंजन-मनोरंजनाचे प्रकार मानवाने शोधले आणि ते 'कला प्रकार' ठरले. कुणी म्हणेल पक्षीही गातात की! मोरसुद्धा नाचतात! पण मोठा फरक असा की, इतर प्राणी-पक्षी हे आवाजाचा किंवा शारीरिक क्षमतांचा वापर फक्त जोडीदार मिळवण्यापुरताच करतात. मानव मात्र आपल्या बुद्धीने त्याला कला प्रकारांचं रूप देऊ शकला. एवढंच कशाला, इतर सजीवांसारखा माणूस फक्त प्रजोत्पादनासाठी कामक्रीडा करत नाही, तर त्यातसुद्धा तो 'रंजन' शोधत असतो! मुद्दा हा की, बैलापुढे तास-दोन तास नाचून गौतमी पाटील हिने नेमकं काय मिळवलं? काही दिवस प्रसारमाध्यमं-समाजमाध्यमांतून चर्चेत राहण्याचं सुख! यापलीकडे काय? असल्यास ते तिला लखलाभ, पण यातून कलावंत म्हणून आपण स्वत:ची अवहेलनाच करून घेतो आहोत का, अशी शंकासुद्धा तिला नाही आली? ती यायला हवी होती, पण आली नाही, याचं कारण काय असावं?एकट्या 'गौतमी पाटील'चाच नव्हे, कुणाही कलाकाराचा, 'सेलेब्रिटी'चा पैशाच्या जोरावर, आपण हवा तसा आणि हवा त्या वेळी वापर करून घेऊ शकतो ही 'धारणा' समाजात तयार होऊ लागली आहे...

**मुंबईसारख्या शहरात अनेक घटना घडतात. अनेक संकटे येतात. कधी अपघात घडतात, कधी नैसर्गिक आपत्ती येते. कधी मुंबई पावसात बुडते. अशा वेळी सर्व सरकारी व इतर यंत्रणांनी एकत्र येऊन सहकार्याने काम केले, तर आपण या संकटांवर मात करू शकतो. त्याचा प्रत्यय २०१७ मध्ये जोरदार पावसामुळे पाणी साचले तेव्हा केलेल्या उपाययोजनेत आला. त्याची ही गोष्ट...**

# महापूर, लेप्टो आणि डॉक्सी

तो दुर्दैवी दिवस २६ जुलै २००५. एका दिवसात झालेल्या तुफान वृष्टीमुळे मुंबई पाण्याखाली गेली होती. आपण अनेक मुंबईकर वेगवेगळ्या ठिकाणी अडकून पडलो होतो. मीसुद्धा किंग्ज सर्कलला रात्रभर अडकलो. पहाटे सायनला जाऊन राहावे लागले. सायन ते चेंबूर पूर्ण भाग पाण्याखाली होता. पुढे दोन दिवसांनी पाणी ओसरले तेव्हा घरी जाता आले.

पुढच्या दोन-तीन आठवड्यात लेप्टोचे असंख्य रुग्ण विविध रुग्णालयांत दाखल होत होते आणि केवळ नायर रुग्णालयात चारशेपेक्षा जास्त रुग्णांचा मृत्यू झाला. त्याचबरोबर मलेरिया, डेंगी, डायरिया अशा अनेक आजारांचा उद्रेक झाला. पावसाळी आजारांचे रौद्ररूप लोकांसमोर आले. तेव्हापासून महापालिकेत १५ मे ते १५ नोव्हेंबरपर्यंत पावसाळी आजारांसाठी कक्ष उघडणे, औषधे व इतर सामुग्री तयार ठेवणे अशा सेवांची एक निश्चित रूपरेषा करून अंमलबजावणी केली जाते. दाखल रुग्णांचा तपशील प्रत्येक दिवशी मुख्यालय, आरोग्य विभाग व मंत्रालय येथे सादर केला जातो. नियमितपणे विभागवार रुग्णसंख्या वाढते, कमी होते, या सर्वांचा काटेकोरपणे आढावा घेतला जातो व योग्य पावले उचलण्यात येतात.

२०१७ मध्ये असेच मुंबईत पाणी तुंबले आणि एका दिवसांत ओसरल्यावर मला महापौर बंगला, अनेक नेते यांचे फोन येऊ लागले. आयुक्तांनी बोलावून विचारले की, आपल्याला जर लेप्टोचे मृत्यू थांबवायचे असतील, तर काय करावे लागेल? मी ताबडतोब कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. केसकर आणि महापालिकेचे इतर आरोग्य अधिकारी, राज्याचे महासंचालक, आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, पावसाळी आजारविषयक



तज्ज्ञ व आमच्या चारही वैद्यकीय महाविद्यालयांचे संबंधित प्राध्यापक यांच्याशी संपर्क करून दुसऱ्या दिवशी सखोल चर्चा करून यासाठी योजना तयार केली. सरकारच्या सर्व परिपत्रकांचा / प्रसिद्ध झालेल्या सर्व संशोधनाचा अभ्यास केला. त्यात जाणवले की अशा परिस्थितीत उद्भवणाऱ्या समस्यांसाठी निश्चित अशी मार्गदर्शक तत्त्वे नव्हती. त्यामुळे सर्वांच्या विचारांनी आम्ही मार्गदर्शक तत्त्वे तयार केली.

## ।। अभंगवाणी ।।



अडकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शरद पवारांचा राजीनामा!

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय, शरद पवारांची मोठी घोषणा

। मुंबई ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी त्यांच्या राजकीय जीवनाबाबत मोठी घोषणा केली आहे. "प्रदीर्घ कालावधीनंतर आता कोठेतरी थांबण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे," असं शरद पवारांनी जाहीर केलं. ते मंगळवारी (२ मे) मुंबईत 'लोक माझे सांगाती' या त्यांच्या राजकीय आत्मकथेच्या सुधारित आवृत्तीच्या प्रकाशन कार्यक्रमात बोलत होते.**

शरद पवार म्हणाले, "१९९९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना झाली, तेव्हापासून गेली २४ वर्षे राष्ट्रवादी पक्षाचा अध्यक्ष म्हणून काम पाहत आहे. सार्वजनीक जीवनातील १ मे १९६० पासून सुरू झालेला हा संपुर्ण प्रवास गेली ६३ वर्षे अविरत चालू आहे. त्यापैकी ५६ वर्षे मी कुठल्या ना कुठल्या सभागृहाचा सदस्य किंवा मंत्री म्हणून सातत्याने काम करत आहे. संसदेतील राज्यसभा सदस्यपदाची पुढील ३ वर्षे शिल्लक आहेत. या काळात राज्याच्या आणि देशाच्या प्रश्नांमध्ये अधिकाधीक लक्ष घालण्यावर माझा भर असेल, याशिवाय मी कोणतीही अन्य जबाबदारी घेणार नाही."

### "मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे"

"सार्वजनिक जीवनातील १ मे, १९६० ते १ मे, २०२३ इतक्या प्रदीर्घ कालावधीनंतर आता कोठेतरी थांबण्याचा विचार करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. तथापि शिक्षण, शेती, सहकार, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात अधिक काम करण्याचा माझा मानस आहे. तसेच युवक, युवती व विद्यार्थी यांच्या संघटनांकडे आणि कामगार, दलित, आदिवासी व समाजातील इतर कमकूवत घटकांच्या प्रश्नांकडे माझे लक्ष राहिल," असं शरद पवार यांनी जाहीर केलं.



### "अध्यक्षपदाच्या निवडीबाबत निर्णय घेण्यासाठी समिती गठीत"

"गेल्या ६० वर्षांत महाराष्ट्राने व आपण सर्वांनी मला खंबीर साथ व प्रेम दिले, हे मी विसरू शकत नाही. परंतू यापुढे पक्ष संघटनेच्या संदर्भात पुढील दिशा ठरवणे आवश्यक वाटते. रिक्त झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडीबाबत निर्णय घेण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सदस्यांची एक समिती गठीत करावी असे मी सुचवू इच्छितो," असं शरद पवारांनी नमूद केलं.

### शरद पवारांनी जाहीर केलेली समितीत सदस्य

प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, के.के. शर्मा, पी.सी. चाको, अजित पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील, अनिल देशमुख, राजेश टोपे, जितेंद्र आव्हाड, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, जयदेव गायकवाड. इतर सदस्य : फौजिया खान, (अध्यक्षा, राष्ट्रवादी महिला काँग्रेस), धीरज शर्मा, (अध्यक्ष राष्ट्रवादी युवक काँग्रेस), सोनिया दूहन, (अध्यक्षा, राष्ट्रवादी युवती काँग्रेस आणि अध्यक्ष, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस).

"ही समिती अध्यक्षपदाच्या निवडीबाबत निर्णय घेईल आणि पक्ष संघटना वाढीसाठी, पक्षाची विचारधारा व ध्येयधोरणे जनतेपर्यंत पोचवण्यासाठी, जनसेवेसाठी सातत्याने झटत राहिल असा मी विश्वास व्यक्त करतो," असंही शरद पवारांनी नमूद केलं.

### "माझ्या सहकाऱ्यांनो, मी अध्यक्षपदावरून जरी निवृत्त होत असलो तरी..."

शरद पवार पुढे म्हणाले, "माझ्या सहकाऱ्यांनो, मी अध्यक्षपदावरून जरी निवृत्त होत असलो तरी माझी सार्वजनिक कार्यातून निवृत्ती नाही. मी सहा दशकांहून अधिक काळ जनमाणसांत काम करीत आलो आहे, त्या सेवेत कुठलाही खंड पडणार नाही. उलट सार्वजनिक कार्यात मला अधिक वेळ देता येईल. मी पुणे, बारामती, मुंबई, दिल्ली अथवा कुठेही असू आपणा सर्वांसाठी नेहमीप्रमाणे भल्या सकाळपासून उपलब्ध राहिल. जनतेच्या अडीअडचणी, प्रश्न यांच्या सोडवणूकीसाठी अहोरात्र कष्ट घेत राहिल."

### "आपली गाऱ्हाणी ऐकण्यासाठी माझी पायपीट अविरतपणे चालू राहिल"

"सततचा प्रवास हा माझ्या जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. मी आपल्या भेटीसाठी सार्वजनिक कार्यक्रम, सभा – समारंभाना येत राहिल. आपणाशी संवाद साधण्यासाठी, आपल्या समस्या जाणून घेण्यासाठी, आपली गाऱ्हाणी ऐकण्यासाठी आणि सरकारकडे मांडण्यासाठी माझी पायपीट अविरतपणे चालू राहिल. जनतेचे प्रेम आणि विश्वास हाच माझा श्वास आहे. त्यामुळे आपणापासून कोणतीही फारकत नाही. मी आपणासोबत होतो, आहे व शेवटच्या श्वासापर्यंत कायम राहणार! त्यामुळे भेटत राहू," असं शरद पवारांनी नमूद केलं.

### "विविध संस्थांमधील कामावर अधिक लक्ष देणार"

शरद पवार पुढे म्हणाले, "आपणास माहिती आहे की, माझा अनेक स्वयंसेवी संस्थांच्या कामकाजामध्ये सहभाग आहे. रयत शिक्षण संस्था (सातारा), विद्या प्रतिष्ठान (बारामती), मराठा मंदीर (मुंबई), महात्मा गांधी सर्वोदय संघ ( उरळी कांचन,पुणे), शिवनगर विद्या प्रसारक मंडळ (बारामती), अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषद (पुणे) या संस्थांमधून साडेचार लाखाहून अधिक विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेतात. तसेच मुंबई शहरामध्ये वैज्ञानिक क्षेत्राला प्रोत्साहित करणारे नेहरू सेंटर, महाराष्ट्राच्या प्रश्नांसंबंधी अभ्यास करणारे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वाचन संस्कृतीला प्रोत्साहित करणारी, काही लाख ग्रंथांचे संवर्धन करणारी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय संस्था, पुणे जिल्ह्यातील मांजरी बु. येथील ऊस व साखरकारखानदारी क्षेत्रात संशोधन- विस्तार कार्य करणारी वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट यासारख्या अनेक संस्थांची मी जबाबदारी सांभाळत आहे व माझे योगदान देत आहे. या कार्यावर यापुढे मी अधिक लक्ष देणार आहे."

# 'वज्रमूठ' कायम राखण्याचेच आव्हान!

## ही वज्रमूठ निवडणुकीत टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान असेल

। मुंबई।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सभा संपल्यावर महाविकास आघाडीतील नेतेमंडळीची परस्परांवर होणारी टीकाटिप्पणी, मुख्यमंत्री आमच्याच पक्षाचा आणि स्वबळाचा भाषा करीत असल्याने ही वज्रमूठ निवडणुकीत टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान असेल.**



छत्रपती संभाजीनगर आणि नागपूरपाठोपाठ वांद्रे-कुर्ला संकुलात झालेल्या महाविकास आघाडीच्या तिसऱ्या वज्रमूठ सभेत उद्धव ठाकरे यांच्यापासून अजित पवार, अशोक चव्हाण, नाना पटोले ते भाई जगताप या साऱ्यांनीच भाजपला पराभूत करण्याकरिता एकत्र निवडणुका लढण्याचा निर्धार व्यक्त केला असला तरी सभा संपल्यावर महाविकास आघाडीतील नेतेमंडळीची परस्परांवर होणारी टीकाटिप्पणी, मुख्यमंत्री आमच्याच पक्षाचा आणि स्वबळाचा भाषा करीत असल्याने ही वज्रमूठ निवडणुकीत टिकवून ठेवण्याचे मोठे आव्हान असेल.

शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे वा आदित्य ठाकरे कायमच महाविकास आघाडी म्हणून निवडणूक लढविण्याची भूमिका मांडीत आहेत. पण काँग्रेस आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांची तोंडे विरोधी दिशांना असतात हे गेल्या महिनाभरात अनेकदा अनुभवास आले. मुंबईतील सभेत मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या मुद्द्याला प्राधान्य मिळणे ओघानेच आले. सर्व निवडणुका एकत्रित लढण्याची भूमिका तिन्ही पक्षांच्या नेत्यांनी मांडली. पण मुंबईत काँग्रेसने स्वबळावर लढण्याचा कधीच नारा दिला आहे. मुंबईत शिवसेना वा राष्ट्रवादीशी युती करण्यास मुंबई काँग्रेसचे अध्यक्ष भाई जगताप यांचा विरोध आहे. तशी जाहीर भूमिका त्यांनी मांडली आहे. तसेच मुंबईत स्वबळावर लढण्यास परवानगी मिळावी, अशी मागणीही त्यांनी पक्ष नेतृत्वाकडे केली आहे.

# “जे पेराल, तेच उगवेल”!

## अतिक अहमदच्या हत्येनंतर योगी आदित्यनाथ यांची प्रयागराजमध्ये पहिलीच सभा

। प्रयागराज महाईन्यूज ।

**उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी गुन्हेगार-राजकीय पुढारी अतिक अहमद आणि त्याच्या भावाची हत्या झाल्यानंतर पहिल्यांदाच प्रयागराजमध्ये पाऊल ठेवले.**

या वेळी एका कार्यक्रमात बोलत असताना ते म्हणाले की, काही लोकांनी आपल्या पापी वृत्तीने प्रयागराजच्या भूमीला जेरीस आणले होते. आपला मुद्दा पटवून देण्यासाठी त्यांनी ‘रामचरितमानस’चा दाखला दिला. ते म्हणाले, हे जग कर्माच्या नियमावर चालते. जो जसा वागतो, तशीच क्रिया त्याच्यासोबत होते. उत्तर प्रदेशमधील स्थानिक स्वराज संस्थेच्या पहिल्या टप्प्यातील निवडणूक प्रचाराचा आज शेवटचा दिवस आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी लुकेरगंज येथील प्रेस ग्राऊंडवर जाहीर सभेला संबोधित करीत असताना अतिक अहमदच्या हत्येवर भाष्य केले.

“हे जग कर्माच्या नियमावर चालते. जे पेराल, तेच उगवेल”, अशा शब्दात योगी आदित्यनाथ यांनी आपला मुद्दा मांडला. मध्ययुगीन काळात तुलसीदास यांनी ‘रामचरितमानस’मधून हा विचार मांडला होता, जो आजही तंतोतंत लागू पडतो, असेही ते म्हणाले. या वेळी ज्या मैदानावर सभा होत होती, त्या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट योगी आदित्यनाथ असे फलक लावण्यात आले होते.

योगी आदित्यनाथ पुढे म्हणाले, “राज्यातील २५ कोटी जनता प्रयागराजमधील अलाहाबाद उच्च न्यायालयात न्यायाच्या अपेक्षेने येते. पण नियतीचा खेळ असा



होता की, याच शहरातील लोकांना न्याय मिळत नव्हता. अन्याय आणि अत्याचाराला येथील लोक बळी पडत होते. पण नियती एक ना एक दिवस सर्वांचा हिशेब करते. ज्यांनी इतरांच्या हातात तमंछा (देशी कट्टा) दिला, त्यांच्यासोबत काय झाले? हे राज्यातील जनतेने पाहिले आहे.”

### योगी आदित्यनाथ यांचा गुंडांना इशारा...

**» योगी आदित्यनाथ यांनी या वेळी गुंडांना इशारा देताना सांगितले की, ज्या गुंड आणि गुन्हेगारांनी अवैधरीत्या जमिनी बळकावल्या आहेत, त्या पुन्हा ताब्यात घेतल्या जातील आणि त्या ठिकाणी गरिबांसाठी घरे बांधली जातील. प्रयागराजमधील जनतेने स्थानिक स्वराज संस्थेच्या निवडणुकीत भाजपाला निवडून दिले तर आमचे सरकार गुन्हेगारी आणि भ्रष्टाचाराविरोधात अशीच कारवाई करीत राहील, असे आश्वासनही त्यांनी दिले.**

प्रयागराजमधील ज्या लुकेरगंज येथे योगी आदित्यनाथ यांची सभा झाली, त्याच शहरात काही दिवसांपूर्वी राज्य सरकारने अतिक अहमदच्या अवैध जमिनीवर जप्ती आणली होती. त्या जमिनीवर गरिबांसाठी घरे बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. योगी आदित्यनाथ म्हणाले की, या घरांचा ताबा लवकरच गरीब लोकांना दिला जाईल.

## आम्हीच मुस्लिमांचं आरक्षण संपुष्टात आणलं

### अमित शहांनी छातीठोकपणे सांगितलं

। नवी दिल्ली। महाईन्यूज ।

भाजप सरकारने मुस्लिमांचे चार टक्के आरक्षण (MUSLIM RESERVATION) संपुष्टात आणले आणि वोक्कलिंग, लिंगायत व एससी, एसटींचा कोटा वाढवला, असे विधान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा (AMIT SHAH) यांनी केले. गुब्बी येथे भाजपच्या वतीने सोमवारी (ता. 1) रोड शो करण्यात आला. यात शहा सामील झाले होते. या शोनंतर शहा यांनी लोकांशी संवाद साधला.

**...तर मुस्लिमांचं चार टक्के आरक्षण पुन्हा लागू करतील**

या वेळी अमित शहा म्हणाले, की 'माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुराप्पा (B. S. YEDIYURAPPA) आणि मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांनी कर्नाटकसाठी खूप मोठे काम करून ठेवले आहे. भाजपने (BJP) मुस्लिमांचे चार टक्के आरक्षण संपुष्टात आणले; तर वोक्कलिंग, लिंगायत, एससी, एसटींचा कोटा वाढवला. जर काँग्रेस (CONGRESS) सत्तेत आली तर ते हा कोटा कमी करतील आणि मुस्लिमांचे चार टक्के आरक्षण पुन्हा लागू करतील.'

**मुस्लिमांचं आरक्षण पुन्हा लागू केलेलं चालणार का?**

तुम्हाला मुस्लिमांचे आरक्षण पुन्हा लागू केलेले चालणार आहे का? असा प्रश्नही शहा त्यांनी विचारला. कर्नाटकमध्ये डबल इंजिनचे सरकार निवडून द्या, असे आवाहनही शहा यांनी केले. जर कर्नाटकमध्ये भाजप निवडून आला, तर मोदी पुन्हा एकदा पंतप्रधान होतील, असेही शहा यांनी सांगितले. दरम्यान, तुमकूर येथील खासदार जी. एस. बसवराज हेही शहा यांच्यासोबत या रोड शोमध्ये सामील झाले होते.

**येडियुराप्पांकडून प्रचार**

माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुराप्पा यांनी तुमकूरला भेट देऊन कुनिगल मतदारसंघात भाजपचे उमेदवार डी. कृष्णकुमार, तुमकूर ग्रामीण मतदारसंघातील उमेदवार बी. सुरेश गौडा यांना मतदान करण्याचे त्यांनी आवाहन केले.



## समान नागरी कायदा, ‘एनआरसी’चे भाजपचे आश्वासन!

## कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी जाहीरनामा

।बंगळूरु। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने सोमवारी जाहीरनामा जारी केला. राज्यात समान नागरी कायदा आणि राष्ट्रीय नागरिकत्व नोंदणी (एनआरसी) लागू करण्याचे आश्वासन पक्षाने दिले आहे.**

समान नागरी कायदा लागू करण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन केली जाणार असून, तिच्या शिफारशींच्या आधारे आम्ही कर्नाटकात समान नागरी कायदा लागू करू. त्याचप्रमाणे, राज्यात राष्ट्रीय नागरिक नोंदणीही आम्ही सुरू करणार असून, त्यायोगे राज्यातून सर्व बेकायदेशीर स्थलांतरितांचे जलद अप्रवासन सुनिश्चित केले जाईल, असे जाहीरनाम्यात म्हटले आहे.“देशाच्या घटनेने आम्हाला समान नागरी कायद्याच्या दिशेने वाटचाल करण्याची मुभा दिली आहे. ‘सर्वांना न्याय, तुष्टीकरण कुणाचेही नाही’ हे आमचे धोरण आहे’, असे जाहीरनाम्याच्या प्रकाशनप्रसंगी उपस्थित असलेले भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांनी सांगितले. ‘कर्नाटक स्टेट विंग अगेन्स्ट रिलिजियस फंडामेंटालिझम अँड टेरर’ (के-स्विफ्ट) हा विशेष विभाग राज्यात सुरू करण्याचेही आश्वासन भाजपने दिले आहे. दारिद्र्यरेषेखालील सर्व कुटुंबांना युगाडी, गणेश चतुर्थी व दीपावली सणांच्या महिन्यांमध्ये प्रत्येकी एक असे स्वयंपाकाच्या गॅसचे तीन सिलिंडर पुरवण्यात येणार आहेत. राज्यात परवडण्यायोग्य, दर्जेदार व आरोग्यदायक अन्न पुरवण्यासाठी प्रत्येक महापालिकेच्या प्रत्येक वॉर्डात ‘अटल आहार केंद्र’ सुरू करण्यात येतील, असेही जाहीरनाम्यात म्हटले आहे. ‘पोषण’ योजनेंतर्गत, दारिद्र्यरेषेखालील प्रत्येक कुटुंबाला दररोज अर्धा लिटर ‘नंदिनी’ दूध आणि महिन्याच्या रेशन किटमधून पाच किलो ‘श्री अन्न- श्री धान्य’ पुरवण्याचे आश्वासनही पक्षाने दिले आहे.

**सहा ‘अ’चे लक्ष्य**

नड्डा यांनी सांगितल्यानुसार, भाजपचा जाहीरनामा सहा ‘अ’भोवती केंद्रित आहे. अन्न (अन्नसुरक्षा), अक्षर (दर्जेदार शिक्षण), आरोग्य (परवडणारे आरोग्य), अदय (निश्चित उत्पन्न), अभय (सामाजिक सुरक्षा) आणि अभिवृद्धी (विकास) हे ते ‘अ’ आहेत. भाजपच्या ‘४० टक्के कमिशन सरकारने’ २०१८

### भाजपची खोटी आश्वासने; काँग्रेसची टीका

**» भाजपने कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी जारी केलेल्या जाहीरनाम्याचे वर्णन काँग्रेसने ‘बोगस’ व ‘झूट लूट बीजेपी मनीफेस्टो’ असे केले आणि लोक या पक्षाला सत्तेतून बाहेर करतील, असे ठासून सांगितले.**




सालच्या जाहीरनाम्यात दिलेली ९० टक्के आश्वासने कधीच पूर्ण केली नाहीत. आज भाजप व बोम्मई यांच्या भ्रष्ट व अक्षम सरकारने जाहीरनाम्यात अशीच बोगस आश्वासने दिली आहेत, असे काँग्रेसचे कर्नाटकसाठीचे प्रभारी रणदीप सुर्जेवाला ट्विटरवर म्हणाले. समान नागरी कायद्याचे आश्वासन म्हणजे लोकांचे लक्ष विचलित करण्याचा आणखी एक प्रयत्न असल्याचे त्यांनी सांगितले.

**भाजप सत्तेत आल्यास लिंगायत मुख्यमंत्री अशक्य -कुमारस्वामी**

बागलकोट: भारतीय जनता पक्ष कोणत्याही स्थितीत लिंगायत मुख्यमंत्री होऊ देणार नाही, असा दावा धर्मनिरपेक्ष जनता दलाचे नेते एच.डी. कुमारस्वामी यांनी केला आहे. बदामी येथे पक्षाच्या प्रचारात त्यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले. प्रचारात जनहिताचे मुद्दे आणण्यापेक्षा वैयक्तिक आरोप-प्रत्यारोपांचीच चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. भाजप किंवा काँग्रेस जनता दलावर आरोप करत असले तरी, आम्ही निष्ठेने काम करत असून, देशाप्रति तसेच राज्याप्रति आमची बांधिलकी आहे असे उत्तर कुमारस्वामी यांनी दिले. कर्नाटकमध्ये विधानसभेसाठी १० मे रोजी मतदान होत आहे.

# हाय मेरी परमसुंदरी..!



फेम अभिनेत्री आलिया भट्ट हिने या वर्षी मेट गालामध्ये पदार्पण केले.मेट गाला हा जागतिक फॅशन इव्हेंट आहे. या वर्षी आलीया प्रथमच मेट गाला इव्हेंट मध्ये सहभागी झाली होती. आलिया मेट गाला इव्हेंट मध्ये अत्यंत सुंदर आणि मनमोहक दिसत होती. आलियाने या इव्हेंटसाठी एका आकर्षक पांढऱ्या गाऊनची निवड केली होती.इव्हेंटसाठी, आलियाने मोत्यांनी सजवलेला स्लीव्हलेस पांढरा गाऊन निवडला. तिने अंगठ्या आणि कानातल्यांसह अनेक दागिने सुद्धा परिधान केले होते.

फोटोंमध्ये,



आलियाने पापाराझींसाठी पोज देताना वेगवेगळे एक्सप्रेशन्स दिलेले दिसत आहेत. आलियाची बहीण शाहीन भट्टने या कार्यक्रमातील आलियाचे फोटो शेयर करत पोस्टला कॅप्शन दिले, "एंजल."

या फोटोंवर प्रतिक्रिया देताना, एका फॅनने लिहिले, "खूप सुंदर आणि आश्चर्यकारक" एकाने लिहिले, "व्वा, ती खूप सुंदर आहे, मी निःशब्द आहे." दुसरी व्यक्ती म्हणाली, "गर्वाचा क्षण." अशा कमेंट करत फॅन्सनी आलियाच्या लूकला पसंती दर्शवली आहे.आलियाचं मेट गालामध्ये जाण्याचं निमित्त खास आहे. आलिया हार्ट ऑफ स्टोनमध्ये (HEART OF STONE) या हॉलिवूड सिनेमात पदार्पण करणार आहे.

टॉम हार्परने दिग्दर्शित केलेला, हार्ट ऑफ स्टोन हा टॉम क्रूझच्या मिशन इम्पॉसिबलच्या मालिकेतील पहिला सिनेमा असेल. या चित्रपटात गाल गॅडोट, जेमी डोर्नन आणि आलिया व्यतिरिक्त सोफी ओकोनेडो, मॅथियास श्वेघोफर, जिंग लुसी आणि पॉल रेडी यांच्या भूमिका आहेत.१ मी २०२३ ला मेट गाला हा फॅशन फेस्टिव्हल न्यूयॉर्क शहरात होत आहे. "कार्ल लेजरफेल्ड: ए लाइन ऑफ ब्युटी." या कॉस्च्युम इन्स्टिट्यूट प्रदर्शनाचे उद्घाटन हा फेस्टिव्हल साजरा करतोय.आलिया व्यतिरिक्त, प्रियंका चोप्रा, किम कार्दशियन, बिली इलिश, केंडल जेनर, रिहाना, गिगी हदीद, नाओमी कॅम्पबेल, ब्लॅकपिंकमधील रोज आणि जेनी आणि लिली-रोज डेप असे अनेक हॉलिवूड सितारे या फेस्टिव्हल मध्ये रेड कार्पेटवर दिसले.

# प्रशांत दामले यांना 'ब्राह्मण भूषण' पुरस्कार जाहीर



मराठी नाट्यसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते प्रशांत दामले हे नेहमीच वेगवेगळ्या कारणांमुळे सोशल मीडियावर चर्चेत असल्याचे दिसून येते. गेल्या तीन दशकांहून अधिक काळ दामले यांनी आपल्या अभिनयानं प्रेक्षकांना जिंकून घेतले आहे. विनोदी अभिनेता म्हणून त्यांची कारकीर्द ही नेहमीच प्रेक्षकांच्या कौतूकाचा विषय ठरली आहे.

यासगळ्यात प्रशांत दामले यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. आम्ही सारे ब्राह्मण व ब्राह्मण व्यावसायिक पत्रिका या नियतकालिकांच्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा ब्राह्मण भूषण पुरस्कार त्यांना जाहीर झाला आहे. अशी माहिती मुख्य संपादक या नियकालिकेचे संपादक भालचंद्र कुलकर्णी, संचालक संजय ओर्पे यांनी दिली आहे. व्यावसायिक नाटकांच्या 12 हजार पाचशेंहून अधिक प्रयोगांचा टप्पा पार केलेले विश्वविक्रमवीर अभिनेते प्रशांत दामले यांना नुकताच राष्ट्रपतींच्या हस्ते संगीत नाटक अकादमीचा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळाला आहे.टिळक महाराष्ट्र विद्यापीठातर्फे त्यांना डी. लिट पदवी मिळाली आहे, या पार्श्वभूमीवर हा पुरस्कार जाहीर करत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. मानपत्र, पुणेरी पगडी व उपरणे असे पुरस्काराचे स्वरुप आहे. या समारंभामध्ये प्रसिद्ध मुलाखतकार राजेश दामले हे प्रशांत दामले यांची प्रकट मुलाखत घेणार आहेत. येत्या शनिवार, दि. 6 मे 2023 रोजी सायं. 5.30 वाजता मॉडर्न कॉलेज सभागृह, शिवाजीनगर येथे होणार्या या समारंभात इंदुमती-वसंत करिअर भूषण पुरस्कार साहित्यिक व पत्रकार डॉ. सागर देशपांडे यांना, डॉ. रामचंद्र देखणे युवा कीर्तनकार पुरस्कार मानसी बडवे यांना आणि भगवान परशुराम ब्राह्मण संस्था पुरस्कार देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण शिक्षणोत्तेजक संस्था, पुणे या शतकमहोत्सवी संस्थेला देण्यात येणार आहे.

# भाऊराव कऱ्हाडे यांना अश्रू अनावर; 'TDM' चित्रपटाला स्क्रीन मिळेना!

**मुंबई: 'ख्वाडा','बबन' या दर्जेदार सिनेमांनंतर आता भाऊराव कऱ्हाडे यांचा 'टीडीएम' (TDM) हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. पण सिनेमा चांगला असूनही शो मिळत नसल्याने कलाकारांना अश्रू अनावर झाले आहेत. दरम्यान मराठी सिनेमा संपवला जात आहे. आता या पुढे सिनेमा करण्याची माझी इच्छा नाही, अशी खंत या सिनेमाचे दिग्दर्शक भाऊराव कऱ्हाडे यांनी व्यक्त केली आहे.**



### मराठी सिनेमा संपवला जात आहे : भाऊराव कऱ्हाडे

भाऊराव कऱ्हाडे यांचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या व्हिडीओमध्ये ते म्हणत आहेत,"टीडीएम' हा सिनेमा प्रेक्षकांना आवडत आहे आणि सिनेप्रेमी हा सिनेमा पाहण्याची इच्छा व्यक्त करत आहे. मात्र सिनेमागृहात शो नसल्या कारणाने मराठी प्रेक्षकांवर आणि कलाकारांवर अन्याय होत आहे. मराठी सिनेमा संपवला जात आहे. आता यापुढे सिनेमा करण्याची माझी वैयक्तिक इच्छा नाही". माझा सिनेमा आवडला नसेल तर लोकांनी तसं स्पष्ट सांगावं. तुझा सिनेमा चांगला नाही, तू लायक नाहीस. त्या दिवशी मी सिनेमा करण्याचं बंद करेन, असं म्हणताना भाऊराव कऱ्हाडे यांना अश्रू अनावर झाले आहेत.

भाऊराव कऱ्हाडे पुढे म्हणाले,"आमचा सिनेमा चांगला आहे असं मी म्हणत नाही. पण या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असताना शो रद्द करणं कितपत योग्य आहे. पिंपरी चिंडवडमध्ये या सिनेमाचे दोन शो होते. सिनेमागृह तुडुंब भरलेलं असतानाही शो वाढवून दिला नाही. हा सिनेमा पाहण्याची प्रेक्षक मागणी करत होते. त्यामुळे मी त्या थिएटर मालकांकडे विचारपूर केली. त्यांनी मला सांगितलं की,या सिनेमाचा एकच शो लावण्याचं वरुन प्रेशर आहे. माझ्या सिनेमाला मिळालेले शो प्राइम टाइममधील नसून ऑड टाइममधील आहेत. या सर्व गोष्टींचा मला सिनेमाच्या टीमला खूप त्रास होत आहे".

### माझ्या सिनेमाला तुम्हीच न्याय मिळवून द्या, हात जोडत अभिनेत्याने प्रेक्षकांना केली विनंती

भाऊराव कऱ्हाडे नेहमी नवोदित कलाकारांना घेऊन सिनेमा बनवण्याचं धाडस करत असतात. 'टीडीएम' (TDM) या सिनेमातील अभिनेता पृथ्वीराज थोरातनेदेखील या प्रकरणावर भाष्य केलं आहे. तो म्हणाला,"मायबाप प्रेक्षकांना टीडीएम सिनेमा पाहायला आहे. मराठी सिनेमा पुढे यायला हवा. आम्ही या क्षेत्रात नवीन आहोत. या क्षेत्रातील जाणकारांकडून आम्ही काय आदर्श घ्यावा? आम्ही खरचं कामं करावी की नाही. महाराष्ट्राची संस्कृती दाखवणारा हा सिनेमा पाहा आणि आमचं काही चुकलं असेल तर आम्हाला नक्की कळवा". हात जोडत त्याने प्रेक्षकांना विनंती केली आहे की,"माझ्या सिनेमाला तुम्हीच न्याय मिळवून द्या".

'टीडीएम' हा सिनेमा 28 एप्रिल 2023 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित झाला आहे. पण या सिनेमाला शो मिळत नसल्याने दिग्दर्शकासह कलाकारांना अश्रू अनावर झाले आहेत. मराठी सिनेमांना स्क्रीन न मिळणं हे मुद्दा जुना आहे. आजवर मराठी मनोरंजनसृष्टीतील अनेक दिग्गज मंडळींनी स्क्रीन मिळण्यासाठी आवाज उठवला आहे. पण अद्याप यावर तोडगा निघालेला नाही.

# इशांत शर्माची भेदक गोलंदाजी!

## गुजरातवर 5 धावांनी रोमांचक विजय, दिल्लीचे प्ले ऑफ मधील आव्हान कायम

। हैदराबाद ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आज आयपीएल २०२३च्या ४४व्या सामन्यात, टेबल टॉपर्स गुजरात टायटन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळला गेला. आठपैकी सहा सामने गमावलेल्या दिल्लीने प्ले ऑफच्या आपल्या आशा जिवंत ठेवण्यासाठी हा सामना 'करो किंवा मरो' केला आणि त्यात कमी लक्ष्याचा बचाव करत गुणतालिकेत पहिल्या स्थानावर असलेल्या माजी विजेते गुजरात टायटन्सवर पाच धावांनी रोमांचक विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ८ गडी गमावून १३० धावा केल्या. प्रत्युतरात गुजरात १२५ धावाच करू शकली.

### गुजरातची सुरुवात खराब झाली

प्रत्युत्तरात गुजरात टायटन्सचा संघ निर्धारित षटकात ६ गडी गमावून १२५ धावा करू शकला. संघाची सुरुवात खराब झाली. दिल्लीप्रमाणेच गुजरातलाही पहिल्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर पहिला धक्का बसला. ऋद्धिमान साहा खाते न उघडता बाद झाला. संघाचा स्टार फलंदाज शुबमन गिलची बॅटही शांत राहिली. तो अवघ्या ६ धावांवर बाद झाला. यानंतर विजय शंकरची बॅटही शांत राहिली. तोही केवळ ६ धावा काढून बाद झाला. यानंतर डेव्हिड मिलर भोपळाही न फोडता तंबूत परतला. अभिनव मनोहरनेही शानदार खेळी करत संघाला विजयाच्या जवळ आणले. तो २६ धावा करून बाद झाला. हार्दिक पांड्याने अर्धशतकी खेळी खेळली मात्र, ती व्यर्थ ठरली . त्याने ७ चौकारांच्या



मदतीने सर्वाधिक ५९ धावा केल्या, मात्र तो संघाला विजय मिळवून देऊ शकला नाही. दिल्लीच्या खलील अहमद आणि इशांत शर्माने प्रत्येकी दोन गडी बाद केले.

इशांतने २०व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर दोन धावा दिल्या. दुसऱ्या चेंडूवर हार्दिकने एकच धाव घेतली. तिसऱ्या चेंडूवर तेवतियाला एकही धाव करता आली नाही. चौथ्या चेंडूवर इशांतने तेवतियाला रिले रुसोकरवी झेलबाद केले. सात चेंडूंत २० धावा करून तो बाद झाला. राशिद खानला पाचव्या चेंडूवर दोन धावा करता आल्या. त्याचवेळी रशीदने शेवटच्या चेंडूवर एकेरी धाव घेतली. अशाप्रकारे इशांतने केवळ सहा धावा केल्या आणि दिल्लीने पाच धावांनी सामना जिंकला.

तत्पूर्वी, अमान खानने अर्धशतकी खेळी खेळत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. त्याने त्याच्या अर्धशतकी खेळीत ३ चौकार आणि एका षटकारांच्या

### शेवटच्या तीन षटकांचा थरार

शेवटच्या तीन षटकात गुजरातला विजयासाठी ३७ धावांची गरज होती. त्यानंतर हार्दिक पंड्या आणि अभिनव मनोहर क्रीजवर होते. १८व्या षटकात खलील अहमद गोलंदाजीसाठी आला. त्याने पहिल्याच चेंडूवर अभिनव मनोहरला बाद केले. या षटकात खलीलने चार धावा दिल्या. गुजरातला शेवटच्या दोन षटकात ३३ धावांची गरज होती. राहुल तेवतिया हार्दिकसोबत फलंदाजीला आला. त्याचवेळी एनरिक नॉर्टजे गोलंदाजीसाठी आला. त्याने पहिल्या तीन चेंडूत तीन धावा घेतल्या. यानंतर तेवतियाने ओव्हरच्या शेवटच्या तीन चेंडूंवर तीन षटकार ठोकले. नॉर्खियाने १९व्या षटकात २१ धावा दिल्या. अशा स्थितीत इशांत शर्मासमोर १२ धावा वाचवण्याचे लक्ष्य होते.

मदतीने सर्वाधिक ५१ धावा केल्या. रिपल पटेलही २३ धावांची खेळी खेळून बाद झाला. दिल्लीने गुजरातसमोर १३१ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ८ विकेट्स गमावून १३० धावा केल्या. संघाची सुरुवात खूपच खराब झाली. दिल्ली कॅपिटल्सने पहिल्या सहा षटकांतच ५ विकेट्स गमावल्या होत्या. पॉवरप्लेमध्ये संघाने ५ विकेट्स गमावण्याची यंदाच्या मोसमातील ही पहिलीच वेळ आहे.

यानंतर कर्णधार डेव्हिड वॉर्नर दुसऱ्याच षटकात धावबाद झाला. डावातील तिसऱ्या आणि दुसऱ्या षटकात शमीने रिले रुसोला बाद केले. रुसला सहा चेंडूत आठ धावा करता आल्या.

# डब्ल्यूटीसी फायनलपूर्वी भारताचा ऑस्ट्रेलियाला मोठा धक्का!

## 15 महिन्यानंतर पुन्हा ठरला नंबर वन

।नवी दिल्ली।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयसीसीकडून टीम इंडियासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यापूर्वी भारतीय संघ आयसीसी कसोटी क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर पोहोचला आहे. गेल्या १५ महिन्यांपासून पहिल्या क्रमांकाच्या कसोटी संघाचे स्थान राखणाऱ्या भारताने ऑस्ट्रेलियाला दुसऱ्या क्रमांकावर ढकलले आहे. डब्ल्यूटीसी फायनलपूर्वी भारतासाठी ही मोठी गोष्ट आहे. डब्ल्यूटीसी २०२३ची फायनल ७ ते ११ जून दरम्यान लंडनमधील



ओव्हल येथे भारत आणि ऑस्ट्रेलिया संघात खेळला जाईल.

आयसीसी कसोटी क्रमवारीत भारतीय संघ आता १२१ रेटिंगसह पहिल्या स्थानावर आहे, तर ऑस्ट्रेलियन संघ ११६ रेटिंगसह दुसऱ्या स्थानावर आहे. इंग्लंड ११४ रेटिंगसह तिसऱ्या तर दक्षिण आफ्रिका १०४ रेटिंगसह चौथ्या स्थानावर आहे.

न्यूझीलंडचा संघ पाचव्या स्थानावर आहे. पाकिस्तान सहाव्या

### जय शाह यांनी भारतीय संघाचे अभिनंदन केले

बीसीसीआयचे सचिव जय शाह यांनी टीम इंडियाचे अभिनंदन केले आहे. त्यांनी ट्विट करून म्हटले आहे की, "जगातील नंबर वन कसोटी संघ बनल्याबद्दल भारतीय संघाचे अभिनंदन. जगातील नंबर वन कसोटी संघाचा दर्जा भारतीय संघाची मायदेशात आणि घराबाहेरील कामगिरीचे प्रतिबिंबित करतो. कसोटीशिवाय आम्ही टी-२० मध्येही नंबर वन आहोत."

तर श्रीलंका सातव्या क्रमांकावर आहे. वेस्ट इंडिज ८व्या तर बांगलादेश ९व्या स्थानावर आहे. झिम्बाब्वे १० व्या स्थानावर आहे.

गेल्या काही सामन्यांच्या अपडेटनंतर भारताला पहिले स्थान मिळाले.आयसीसीने सोमवारी जाहीर केलेल्या वार्षिक क्रमवारीत भारताला पहिले स्थान मिळाले आहे. गेल्या काही सामन्यांमुळे हा बदल झाला आहे. बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये भारताकडून १-२ अशा मालिका पराभवानंतर ऑस्ट्रेलियन संघ अव्वल स्थानावर राहिला. परंतु आता क्रमवारीत बदल झाला आहे. ऑस्ट्रेलियन संघ १५ महिन्यांपासून पहिल्या स्थानावर होता, मात्र भारताने १५ महिन्यांची वर्चस्व संपवले आहे. टेस्ट व्यतिरिक्त टी-२० मध्येही भारत अव्वल आहे. मात्र, एकदिवसीय क्रमवारीत भारत तिसऱ्या स्थानावर आहे.

# शमीच्या भेदक माऱ्यापुढे कॅपिटल्सचे फलंदाज गारद

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।



आयपीएल २०२३च्या ४४व्या सामन्यात टेबल टॉपर्स गुजरात टायटन्सचा सामना दिल्ली कॅपिटल्सशी होत असून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर हा सामना खेळला जात आहे. आठपैकी सहा सामने गमावलेल्या दिल्लीसाठी आपल्या आशा जिवंत ठेवण्यासाठी हा लढा 'करो या मरो' असा सामना झाला आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ८ विकेट्स गमावून १३० धावा केल्या असून बलाढ्य गुजरातसमोर १३१ धावांचे किरकोळ लक्ष्य ठेवले आहे.

अमान खानने अर्धशतकी खेळी खेळत संघाला सन्मानजनक धावसंख्येपर्यंत नेले. त्याने त्याच्या अर्धशतकी खेळीत ३ चौकार आणि एका षटकारांच्या मदतीने सर्वाधिक ५१ धावा केल्या. रिपल पटेलही २३ धावांची खेळी खेळून बाद झाला. दिल्लीने गुजरातसमोर १३१ धावांचे लक्ष्य ठेवले आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना दिल्लीने २० षटकांत ८ विकेट्स गमावून १३० धावा केल्या. संघाची सुरुवात खूपच खराब झाली. दिल्ली कॅपिटल्सने पहिल्या सहा षटकांतच ५ विकेट्स गमावल्या होत्या. पॉवरप्लेमध्ये संघाने ५ विकेट्स गमावण्याची यंदाच्या मोसमातील ही पहिलीच वेळ आहे. सामन्याच्या पहिल्याच चेंडूवर मोहम्मद शमीने गुजरातला यश मिळवून दिले. त्याने फिलिप सॉल्टला डेव्हिड मिलरकरवी झेलबाद केले. मीठाला खातेही उघडता आले नाही आणि तो गोल्डन डकचा बळी ठरला. यानंतर कर्णधार डेव्हिड वॉर्नर दुसऱ्याच षटकात धावबाद झाला.